# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक: 19.05.2024** **वारः रविवार**

---

1.लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील प्रचाराची काल सांगता
2.निवडणुक आयोगाच्या सतर्कतेमुळं आतापर्यंतच्या कारवाईत एकंदर 8 हजार कोटींचा मुद्देमाल जप्त
3.नागरिकांना वेळत न्याय देण्याच्या हेतूनं फौजदारी न्यायप्रक्रियेत बदल केल्याचं अर्जून राम मेघवाल यांचं प्रतिपादन
4.श्रीलंकेतल्या सीताअम्मन मंदिरात आज कुंभाभिषेक सोहळा
5.वायव्य भारतासह देशातल्या अनेक भागात पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता

**प्रचार**
लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील प्रचार काल सायंकाळी संपला. आपल्या झंझावाती प्रचार दौऱ्यात जास्तीत जास्त मतदारसंघांचा समावेश करून आपल्या पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा मिळवण्यासाठी राजकीय दिग्गज प्रयत्नशील होते. या टप्प्यात सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांतील ४९ जागांसाठी उद्या मतदान होणार आहे. ओडिशा विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात 35 विधानसभा जागांसाठी मतदान होणार आहे. दरम्यान, उर्वरित टप्प्यातील प्रचारालाही वेग आला आहे.

**योगीप्रचार**
महायुतीच्या उमेदवारांसाठी काल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाराष्ट्रात धुळे, पालघर, मालेगावात प्रचारसभांना संबोधित केलं. देशात काँग्रेसची सत्ता येणं कधीच शक्य नाही.

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याअखेर देशात एकच नारा घुमतो आहे ते म्हणजे फिर एक बार मोदी सरकार. त्यामुळे महाराष्ट्रातल्या पाचव्या टप्प्यातल्या सर्व १३ जागांवर महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून देत संसदेत पाठवा, असं आवाहन योगी आदित्यनाथ यांनी खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांच्या प्रचाराची सांगता करताना केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीत दहशतवादाला पायबंद बसला असून पाकिस्तान सारख्या राष्ट्राला जरब बसली असं प्रतिपादन त्यांनी काल नाशिक जिल्ह्यातील मालेगाव इथं केले.

**आघाडी पत्रकार परिषद**
युपीए सरकारच्या काळात देशात अन्नसुरक्षा कायदा आणला होता, पुन्हा सत्तेत आल्यावर १० किलो धान्य मोफत देऊ तसंच वस्तू सेवा कराचा एकच दर लागू करू असं आश्वासन काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल पत्रकार परिषदेत दिले. संविधानानं दिलेलं आर्थिक मागास आरक्षण कायम ठेवत, राज्यपातळीवर आरक्षणाविषयी आयोगाच्या शिफारसींनुसार योग्य निर्णय घेऊ असंही ते म्हणाले.  महाराष्ट्रात महाविकास आघाडी ४८ पैकी ४६ जागांवर विजय मिळवेल असा विश्वासही खर्गेंनी व्यक्त केला.

देशातल्या सर्व जातधर्माच्या सर्व संस्था आणि वास्तूंचा सन्मान आमचं सरकार करेल असं शरद पवार यांनी या पत्रकार परिषदेत सांगितलं.

**6वा**
लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात आठ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतील एकंदर ८८९ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. यात जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग-राजौरी लोकसभा मतदारसंघातील निवडणूक लढविणाऱ्या २० उमेदवारांचा समावेश आहे. या टप्प्यात ५८ लोकसभा मतदारसंघांसाठी एकंदर १ हजार९७८ उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

**कारवाई**
लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर निवडणूक आयोगानं केलेल्या  एकत्रित कारवाईत ८ हजार ८८९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अमली पदार्थांवर  कडक लक्ष ठेवण्यात आल्यानं जप्तीच्या कारवाईमध्ये वाढ झाली आहे.   यामध्ये चार हजार कोटी रुपयांच्या मनोविकारावरील औषधी पदार्थांचा समावेश

आहे.आयोगाकडून मतदारांना दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या प्रलोभनाच्या प्रयत्नांवर करडी नजर ठेवण्यात येत आहे. यासाठी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सक्तवसुली संस्थांना सतर्कता वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**फौजदारी कायदे**

केंद्र सरकारनं लोकांना वेळेत न्याय देण्यासाठी वसाहतकालीन फौजदारी न्याय प्रणाली बदलली असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयाचे राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केलं. गुवाहाटी इथं काल भारतीय तंत्रज्ञान संस्थेमध्ये दुसऱ्या परिषदेच्या उद्घाटन सत्रात 'फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनातील भारताची पुरोगामी वाटचाल' या विषयावर ते बोलत होते. तत्कालीन वसाहतवादी राज्यकर्त्यांच्या दृष्टीकोनातून अंमलात आणलेल्या तसंच भारतीय भावना आणि मूल्यांचा अभाव असलेल्या फौजदारी न्याय व्यवस्थेत बदल करण्याची गरज मेघवाल यांनी अधोरेखित केली.

नवीन कायदे, भारतीय न्याय संहिता, 2023; भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ आणि भारतीय दक्षता अधिनियम २०२३ हे वृत्तविषयक कायदे लोककेंद्री असून देशाच्या विकासाच्या वेगाचा विचार करून केंद्र सरकारनं हे कायदे स्वीकारले.

यावेळी बोलताना, नवीन कायदे शिक्षेऐवजी न्याय देण्यावर अधिक भर देतात असं सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हृषिकेश रॉय यांनी सांगितलं.

**मणीपुर**

माणिपूरमध्ये काल एका बांधकाम कंपनीच्या ३ मंजुरांवर अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या. त्यापैकी एकाचा गोळी लागून मृत्यू झाला तर उर्वरित दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही दुर्घटना काल रात्री इंफाळ पश्चिम जिल्ह्याच्या नोरमथोंग परिसरात घडली. हल्लेखोरांनी मजुरांना कंपनीतून बाहेर काढून थेट त्यांच्यावर गोळीबार केल्याची माहिती पोलिसांनी दिली. हे सर्व मंजूर झारखंड राज्यातले रहिवासी आहेत. कालच आणखी एका घटनेत फॅशन डिझायनर आणि स्पा चालक असलेल्या एका व्यक्तीला अज्ञात हल्लेखोरांनी पायावर गोळ्या झाडल्या होत्या.

**श्रीलंका**

श्रीलंकेतल्या अशोक वाटीकेतील सीता अम्मन मंदिरात आज कुंभाभिषेक सोहळा होणार आहे. या सोहोळ्यासाठी तिरुमला तिरुपती मंदिरातील 5 हजार लाडूंसोबतच अयोध्येतून शरयू नदीतलं पाणीही नेण्यात आलं आहे. सीता अंमन मंदिर रामायण मार्गाचा भाग आहे. या उत्सवात सहभागी होण्यासाठी भारत आणि नेपाळच्या अनेक भागातून भाविक श्रीलंकेत दाखल झाले आहेत. अध्यात्मिक गुरु, विश्व हिंदू परिषद आणि जागतिक रामायण परिषदेचे सदस्य आणि अयोध्येतील राम मंदिरातील भक्तही या सोहोळयात सहभागी होणार आहेत. सीता इलिया किंवा अशोक वाटिका हे ठिकाण म्हणजे जिथं रावणानं सीतेला कैदेत ठेवलं होतं ती जागा असल्याची मान्यता आहे.

**कार्बाईड**

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अर्थात एफएसएसएआयनं फळं व्यापारी, विक्रेते आणि फळं पिकवणाऱ्या यंत्रणा चालकांना कृत्रिमरित्या फळं पिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कॅल्शियम कार्बाइडवरील बंदीचं काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आरोग्य मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे की, राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा विभागांना सतर्क राहण्याचा आणि अशा बेकायदेशीर कृत्यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींवर गंभीर कारवाई करण्याचा एफएसएसएआयकडून सल्ला देण्यात आला आहे.

फळं पिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कॅल्शियम कार्बाइड मुळं ॲसिटिलीन वायू तयार होतो. या वायुमध्ये आर्सेनिक आणि फॉस्फरसचे हानिकारक अंश असतात. 'मसाला' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पदार्थांमुळं आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.

त्यामुळे अन्न सुरक्षा आणि मानक नियम २०११ नुसार फळं पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.
एफएसएसएआयनं भारतात फळं पिकविण्यासाठी सुरक्षित पर्याय म्हणून इथिलीन वायूच्या वापराला परवानगी दिली आहे.

**MARITIME WOMEN DAY**

नौवहन संचालनालय आणि बंदर मंत्रालय यांनी संयुक्तरित्या सागरी क्षेत्रातल्या महिलांसाठी काल मुंबईत तिसऱ्या अंतरराष्ट्रीय महिला दिनाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात सागरी क्षेत्रातल्या मान्यवर महिला ,नाविक आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य सहभागी झाले होते. या क्षेत्रातल्या प्रमुख महिलांनी यावेळी मेळाव्याला संबोधित केलं.सागरी क्षेत्रातल्या महिलांची गुणात्मक आणि परिणामात्मक भूमिका वाढवण्याबाबत त्यांनी त्यांचे अनुभव यावेळी सांगितलं.

**ATHLETICS-LISBON**

भारताच्या विक्रांत मालिकनं पोर्तुगालमध्ये लिस्बन इथं काल झालेल्या भालाफेक स्पर्धेत पुरुष गटात विजेतेपद पटकावलं. विजेतेपद मिळवण्याच्या तिसऱ्या प्रयत्नात विक्रांतनं ८० पूर्णांक ३० मीटरवर भाला फेकला. पोर्तुगाल मधली ही स्पर्धा जागतिक एथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर चॅलेंजर स्तरावरील स्पर्धा होती.

**बॅडमिंटन**

बॅंकॉक इथं झालेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रॅनकीरेड्डी या जोडीचा आज पुरूष दुहेरीच्या अंतिम फेरीत चीनच्या जोडीशी सामना होणार आहे.

**उष्णता**

वायव्य भारतातील पठारी भागात पुढील पाच दिवस तर पूर्व आणि मध्य भारतात तीन दिवस उष्णतेची लाट राहाण्याची शक्यता आहे. ईशान्य भारताचा काही भाग तसंच उत्तराखंड, गुजरात आणि मध्य प्रदेशात ,उद्यापासून  22 तारखेपर्यंत  उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता असल्याचं भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे. पश्चिम राजस्थानमध्ये बहुतांश ठिकाणी, हरियाणा-चंदीगड-दिल्ली, पंजाब, पूर्व राजस्थान आणि उत्तर प्रदेश, बिहार आणि गुजरातमध्ये काही भागात उष्णतेची तीव्र लाट पसरली आहे. येत्या २३ मे पर्यंत दक्षिण भारतात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.  पुढील ४८ तासांत नैऋत्य मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, आग्नेय बंगालच्या उपसागराचा काही भाग आणि निकोबार बेटांवर येण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.